महाराष्ट्र पोलीस

## पोलीस अधीक्षक,कार्यालय जालना
## पोलीस शिपाई भरती - 2022-23

पोलीस शिपाई भरती 2022-23 साठी मैदानी चाचणी दिनांक 19/06/2024 ते दिनांक 23/06/2024 पावेतो पोलीस मुख्यालय,जालना येथील पोलीस परेड ग्राऊंडवर घेण्यात आली होती. व सदर मैदानी चाचणी मध्ये प्राप्त गुणांची यादी मैदानी चाचणीच्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीमधील नमुद बाबी,जसे मैदानी चाचणीचे गुण,सामाजिक आरक्षण,समांतर आरक्षण, एनसीसी प्रमाणपत्र इ. बाबत उमेदवारास काही आक्षेप असल्यास तसे या कार्यालयास कळविणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

नमुद कालावधीमध्ये एक ही आक्षेप प्राप्त न झाल्याने उपरोक्त नमुद यादीमधुन लेखी परिक्षेसाठी 1:10 प्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी दिनांक 29/06/2024 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती व सदर बाबतीत कांही आक्षेप असल्यास तसे दुरध्वनी/भ्रमणध्वनी वर कळविणे बाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

दिनांक 03/07/2024 रोजी उमेदवार चेस्ट नं.1274 अर्जुन भगवानराव ठोंबरे यांनी आवेदन अर्ज SBC प्रवर्गातुन नजरचुकीने भरला असुन, त्यांचा मुळ प्रवर्ग OBC आहे. त्यांना मैदानी चाचणी मध्ये 32 गुण मिळाले आहेत. OBC प्रवर्गातील 25 गुण मिळालेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आल्याने सदर उमेदवार यांनी नजरचुकीने SBC प्रवर्गातुन आवेदन अर्ज भरला आहे. परंतु त्यांचा मुळ प्रवर्ग OBC असल्याने त्यांचा मुळ प्रवर्ग OBC गृहित धरणेबाबत निवेदन सादर केल्याने त्यांना OBC प्रवर्गात समाविष्ठ करुन त्यांना दिनांक 07/07/2024 रोजी जे.ई.एस.कॉलेज, दुर्गामाता मंदीर रोड, जालना येथे होणा-या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

तरी उमेदवार चेस्ट नं.1274 अर्जुन भगवानराव ठोंबरे यांनी दिनांक 29/06/2024 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या पत्रकामधील सुचने प्रमाणे दिनांक 07/07/2024 रोजी सकाळी 07.00 वा.लेखी परिक्षेच्या ठिकाणी हजर रहावे.

(अजय कुमार बंसल)
पोलीस अधीक्षक,जालना

Scanned with OKEN Scanner